International Journal of Applied Research 2018; 4(11): 259-261



International Journal of Applied Research

**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2018; 4(11): 259-261
www.allresearchjournal.com
Received: 28-09-2018
Accepted: 29-10-2018

**डॉ. शीतल पावसकर भोसले**
मराठी विभाग, आर.के.तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर ३, महाराष्ट्र, भारत

**Corresponding Author:**
**डॉ. शीतल पावसकर भोसले**
मराठी विभाग, आर.के.तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर ३, महाराष्ट्र, भारत

# मराठी बालकवितेला वेगळा आयाम देणारी विंदांची बालकविता

**डॉ. शीतल पावसकर भोसले**

**प्रस्तावना**

साठोत्तरी मराठी कवितेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून विंदा करंदीकरांच्या कवितेकडे निर्देश केला जातो. विंदांच्या चतुरस्त्र प्रतिभेने काव्यलेखनाबरोबरच ललितलेखन, अनुवादक्षेत्र यांतही आपला अमीट ठसा उमटविलेला दिसतो.

विंदांच्या लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर साम्यवादी विचारधारेचा प्रभाव असल्यामुळे, प्रस्थापित व्यवस्थेत वेगवेगळ्या तऱ्हांनी 'शोषित' बनविल्या गेलेल्या माणसाच्या पीडेला विंदांच्या कवितेत गाभाभूत स्थान प्राप्त झालेले दिसते. अष्टदर्शनच्या निमित्ताने त्यांच्या कवितेने पाश्चिमात्त्य आणि पौर्वात्य दर्शनांतील मर्मस्थळांचा काव्यात्म आविष्कार घडविला आहे. विंदा करंदीकर यांच्या काव्यपातळीवरील प्रतिभेचा आणखी एक अत्यंत मौलिक आविष्कार म्हणजे त्यांच्या बालकविता होत. अगदी सुरुवातीपासून म्हणजे स्वेदगंगा या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहापासूनच ते बालकविता लिहित होते. विंदांनी राणीची बाग (१९६१), एकदा काय झाले (१९६१), एटू लोकांचा देश (१९६३), सशाचे कान (१९६३), परी ग परी (१९६५), सर्कसवाला (१९७५), पिशीमावशी आणि तिची भुतावळ (१९८१), अडम् तडम् (१९८५), टॉप (१९९३), सात एके सात (१९९३), इत्यादी काव्यसंग्रहांतून बालकवितांचा संवेदनशील आविष्कार घडविलेला दिसतो.

विंदांचे बालमानसविश्वाबद्दलचे आकलन अतिशय मूलगामी आहे. तीव्र निरागसता, कार्यकारणसंबंध शोधण्यासाठी आवश्यक असणाऱ्याच तर्कबुद्धीचा अभाव, जीवनाबद्दलची अपार जिज्ञासा तसेच आयुष्याकडे पाहण्याचा एकप्रकारचा अनाघ्रातपणा, या विशेषांचे बालमानसविश्वाशी असलेले अतूट नाते, विंदांच्या चिंतनाचा विषय असलेला दिसतो. स्वाभाविकच, तार्किक पद्धतीने घडू न शकणाऱ्या अनेक गोष्टी कल्पनेच्या पातळीवर घडू शकतात या गृहीतकांवर उभे असलेले बालमानसविश्व, विंदांच्या कवितेत त्याच्या अनेकानेक विभ्रमांसह आविष्कृत झाले आहे. कासवाचे मणभर सुंठ उगाळणे, सुईच्या नेढ्यातून उंटाचे जाणे, परीचे स्वतःच्या नथीत जाऊन बसणे, आकाशातील चांदणीने शिडीचा वापर करून पृथ्वीवर येणे, सांबराच्या शिंगांना छत्तीस फाटे फुटणे, झुरळाचे रेडिओत जाऊन गवई होऊन बाहेर येणे, चिक्कणकाकूंच्या करंज्यांच्या चिमण्या होऊन उडून जाणे, इत्यादी संदर्भ विंदांच्या प्रतिभेतील कल्पनाचमत्कृतीतून साकारताना दिसतात. बालमानसविश्वातील निरागसपण आणि व्यापून राहिलेला 'वेडाचार' या सगळ्या घटितांना एका विशिष्ट चौकटीत वास्तवाचे मोल देऊन जातो. वर नमूद केलेल्या चमत्कृती या मुलांच्या दृष्टीने चमत्कृती नसतातच. त्यांच्या दृष्टीने या सर्व गोष्टी कवितेतच नाही तर प्रत्यक्षातही घडू शकतात. त्यांना असे वाटते कारण ते घडण्या – न घडण्यामागील कारणमीमांसा त्यांना ठाऊक नसते. काव्यगत अवकाशात या प्रकारच्या चमत्कृतीजन्य घटितांची रचना केल्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीचा विस्तार होऊन अमूर्ताला मूर्त रूप देण्याची क्षमता विकसित करण्याचे श्रेय विंदांच्या बालकवितेला प्राप्त होते, असे म्हणता येते.

लहान मुलांच्या भावविश्वात अतिशय महत्त्वाचे स्थान असलेल्या कुत्रा, मांजर, चिमणी, कावळा, कोल्हा, उंट, जिराफ आदी पक्षीप्राणीसृष्टीचा मुक्त वावर विंदांच्या बालकवितेत असलेला दिसतो. पक्षीप्राणीसृष्टीतील या पात्रांना माणसांसारख्या भावभावना असलेल्या दिसतात. बालमानसविश्वाला परिचित असलेल्या, आनंद देणाऱ्या या पक्षीप्राण्यांसोबत करंदीकरांच्या कवितेत विंचू, साप, पाल यांसारख्या विषारी आणि एरवी भय आणि किळस वाटणाऱ्या प्राण्यांचाही समावेश झालेला आहे, ही बाब विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. विंचू, साप आणि पाल यांच्यातील विषारीपणाचा अंश बाजूला ठेवून त्यांची मुलांना ओळख करून देणे, या प्राण्यांबद्दल त्यांच्या मनात आपुलकी निर्माण करणे तसेच या प्राण्यांच्या संदर्भात मुलांना वाटणाऱ्या भयाचा निचरा करणे, आदी प्रेरणा या प्रकारच्या प्राण्यांची कवितागत अवकाशात संरचना करण्यामागे असाव्यात किंवा कसे, असा प्रश्न यासंदर्भात उपस्थित करता येऊ शकेल. सापावरची कविता या दृष्टीने विशेष लक्षणीय आहे.

प्राणीपक्षी यांच्या बरोबरीने जेवणात येणार्याय कांदा, लिंबू, काकडी, सुरण, फ्लॉवर, माठ, मेथी, मुळा, भेंडी, फणस, आंबा, चिकू इत्यादी भाज्या आणि फळे यांनाही या कवितेत स्थान प्राप्त झाले आहे.

लहान मुलांचे भावविश्व जसे काऊचिऊम्याऊचे असते तसेच ते पांढराशुभ्र झगा घालून आकाशात वावरणार्यो पर्यांचेही असते. ही आकाशाची परी लहान मुलांची मैत्रीण, सखी असते, परी त्यांच्याशी बोलते, त्यांच्याशी हितगुज करते. विंदांच्या परी ग परी या काव्यसंग्रहातील कविता पर्यांचच्या भावविश्वाची ओळख करून देणार्या् आहे. बालमानसविश्वातील 'परी' या मिथकाप्रमाणेच भयकारक अनुभव देणारा बागुलबुवा, भूतंखेतं आदी मिथकांनाही विंदांच्या कवितेने मोकळेपणाने आपल्या कवेत घेतलेले दिसते. पिशीमावशी आणि तिची भुतावळ हा काव्यसंग्रह यासंदर्भातील लक्षणीय उदाहरण म्हणून नोंदविता येईल. सदर काव्यसंग्रहात भूतबाई, महासंमंध, थातुमातु, भूत, आग्या वेताळ, मुंजा इत्यादी विविध रूपांमधील भुतावळ भयकारी वातावरणासह साकारलेली दिसते.

लहान मुलांना पर्यांसोबत बागुलबुवा, भूतांचीही मिथ सांगण्यामागील कवींचे प्रयोजन काय असावे, असा प्रश्न विंदांच्या प्रातिभ काव्याविष्कारामागील मानस समजून घेताना निर्माण होतो. याचे एक संभवनीय उत्तर हे, या प्रकारच्या भयप्रद वातावरणामुळे मुलांच्या मनांतील भीतीची भावना काही क्षणांसाठी वाढली तरी अंतिमतः तिचे विरेचन होण्याची शक्यता असते, हे असू शकेल. तर दुसरे उत्तर हे जीवनात ज्याप्रमाणे परीसारख्या सुंदर, हव्याहव्याशा, भुरळ घालणार्या गोष्टी असतात तशाच बागुलबुवा, पिशीमावशीसारख्या भयप्रद, नकोशा असणार्यु कुरूप गोष्टीही असतात आणि या गोष्टींना टाळून जगता येत नाही हे असावे. पिशीमावशी प्रवृत्तीला टाळता येत नसेल तर ती जशी आहे तशी आपलीशी करण्याचा संस्कार उपरोक्त संदर्भांच्या मुळाशी असावा, असे म्हणता येते.

विंदा हा सामाजिक बांधिलकी मानणारा संवेदनशील कवी असल्यामुळे बालकवितेत चमत्कृतिप्रधान गोष्टी, घटनांमध्ये वावरताना सुद्धा त्यांची ही जाणीव तपशिलांमधून सातत्याने अभिव्यक्त होत राहते. परीचा पडला दगडावर पायसारखी कविता त्यांच्या उदार करुणामयी मनोवृत्तीचा काव्यात्म आविष्कार आहे. दगडालाही जीव असतो, भावना असतात असे म्हणत परीने दगडाच्या भावनांचा आदर केला, असा संदर्भ या कवितेत येतो. लहान मुलांची लाडकी परी जर दगडाच्या भावनांचा, पर्यायाने चराचराचा आदर करत असेल तर आपणही तसेच वागले पाहिजे, असा हा संस्कार कळतनकळतपणे ही कविता देत असणार हे स्पष्टच आहे. करंदीकरांच्या माझ्या मना बन दगड सारख्या कवितेतून बधीर होत चाललेल्या समाजवर्तुळात जगताना आपल्याला आपली संवेदना, आपलं संवेदनशील असणं मारून टाकावं लागेल असा सूर लागलेला असताना, बालकवितेतून मात्र दगडालाही तरल, मनस्वी आणि मानवी संवेदनेच्या संपृक्ततेने आपलसं करावं असं कवीचं म्हणणं, बालमनावर करुणेचा संस्कार सूचकपणे घडवत जातं, ही बाब बालकवितेचे सामाजिक श्रेय तपासून पाहताना आवर्जून नोंद घ्यावी अशी आहे.

सर्कसवाला हा काव्यसंग्रहही यादृष्टीने लक्षणीय ठरतो. सर्कसवाला या कवितामालिकेतून कवितागत मीचा सर्कशीतील मित्र 'डरा' त्याच्यापासून दुरावतो आणि या सत्याचा निमूट स्वीकार करत कवितागत मी डराच्याप्रमाणे त्याला सलाम करून निरोप देताना दिसतो. परीने दगडातील जिवंतपण समजून घेऊन त्याला स्वीकारणे आणि कवितागत मीने आयुष्यावर न चिडता 'डराचं जाणं' स्वीकारणे या बाबी संवेदनेच्या पातळीवर समृद्ध करणार्याष आहेत. 'जादूगार'सारख्या कवितेतून मोठेपणी जादूगार होऊन वेगवेगळे जादूचे प्रयोग करण्याची आकांक्षा बाळगणारा लहान 'अरु' कवितेच्या पुढील टप्प्यावर कुरूप–काळ्या, न शिकलेल्या ताईचे, दोन धड लुगडी नसणार्यार आईचे, फी न भरल्यामुळे शाळेपासून वंचित राहणार्या भावाचे दुःख दूर करण्याची जादू करण्याचा मानस व्यक्त करताना दिसतो. 'मी मोठेपणी जादुगार होणार' अशी कल्पनाजन्य अनुभूती जगताना दुसर्या बाजूला मात्र बालमनाला दिसणारे लौकिक जीवनातील प्रश्न अतिशय तरलपणे या कवितेतून व्यक्त होतात. अशा प्रकारच्या कवितांतून बालविश्वाची कुरूपतेचे गालबोट वागविणार्याय सामाजिक विषमतेशी, वंचिततेशी नाळ जोडण्याचा कलात्म प्रयत्न घडलेला दिसतो.

विंदांच्या बालकवितेत परी, पक्षी, बागुलबुवा यांच्याप्रमाणेच देवांचे मानुषीकरण झालेले दिसते. स्वाभाविकच, प्रौढ मानसिकतेत असणारे देवाचे माहात्म्य, त्या संदर्भातील सोवळेओवळे, परमेश्वराला उच्च स्थानी कल्पिणे इत्यादी संदर्भ या कवितेतून गळून गेलेले दिसतात. गणपतीबाप्पाचे दोंद वाढलेले असल्यामुळे दहा जोरबैठका काढायला कवितागत मीने सांगणे आणि विठोबाकडून सही मागणार्यीला विठोबाने, 'देवांना नसते लिहायला येत' असे म्हणणे, गणपतीविसर्जनाच्या वेळी, 'गणपतीबाप्पाच्या खिशावर आपल्या घराचा पत्ता लिहा' असे कवितागत मीने म्हणणे, हे संदर्भ या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे आहेत.

विंदांनी एटू लोकांचा देश या काव्यसंग्रहातून 'एटू लोकांचा देश' ही नवीनच मिथ निर्माण करून या देशातील जीवनव्यवहाराचे तपशील छोट्याछोट्या बारकाव्यांसह साकारले आहेत. प्रस्तुत काव्यसंग्रहातील 'कवितेतील लोक', 'नद्या', 'पर्वत', 'उद्योगधंदे', 'शिक्षण', 'वाङ्मय', 'देव', 'न्यायनिवाडा' ही शीर्षके या दृष्टीने लक्षात घेण्याजोगी आहेत. विंदांच्या कवितेतील 'बकीआत्ये', 'धोंड्या न्हावी', 'कावेरी डोंगरे' ही व्यक्तिचित्रे सर्वांच्या परिचयाची आहेत. विंदांनी बालकवितेतही शिस्तीचा आग्रह धरणारे जुन्या काळातील मास्तर त्यांच्या सर्व कठोरपणासह 'पंतोंजी' या कवितेत रेखाटले आहेत. 'आजी', 'खान अब्दुल गफारखान' या कविताही व्यक्तिचित्रे या सदरात मोडतात. 'भीमाचे जेवण', 'कुंभकर्ण' या कवितांमधून विंदांनी पौराणिक काळातील व्यक्तींचे स्वभावविशेष नेमकेपणाने आणि मिश्कीलपणे टिपले आहेत. भीम आणि कुंभकर्ण या दोन पुराणकालीन पुरुषांची ओळख विनोदी पद्धतीने बालविश्वाला घडविली जाते. ही सर्व व्यक्तिचित्रे बारीकसारीक रंगसूचनासदृश तपशिलांची समृद्धता घेऊन साकारताना दिसतात.

'पाव्हणी' आणि 'ये रे ये रे पावसा' या कवितांमधून विंदांनी बालमानसिकतेला परिचित असणार्याच संदर्भांना वेगळा अन्वयार्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. 'पाव्हणी' या कवितेत पावसाने चिमणीचे घर वाहून गेल्यावर तिला कावळ्याने आपल्या घरात बोलावण्याचा संदर्भ व्यक्त होतो. ही कविता वाचताना कावळाचिमणीची गोष्ट आणि त्यातील चिमणीचे पावसातही घर टिकून राहिल्यामुळे सुरक्षित असण्याची स्मृती मनात जागृत होते. या स्मृतीच्या पार्श्वभूमीवर कावळ्याने चिमणीला आसरा देणे हे कावळ्याच्या स्वीकारशील, क्षमाशील वृत्तीचा वरवर उच्चार करणारे वाटले तरी दुसर्यो बाजूने आसर्याच्या बदल्यात 'चिमूताई चिमूताई स्वैपाक करा' असे म्हणणे आणि तिच्याकडून विशिष्ट प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा करणे ठळकपणे अधोरेखित होते. (स्त्रीवादी विचारचौकटीतून या कवितेचा वेगळा अन्वयार्थ लावणे शक्य आहे.) तर बालमानसिकतेचा 'ये रे ये रे पावसा' हे पावसाचे गीत, 'परी ग परी' मधील 'उपाय नाही खोटा, बहर आला मोठा' हा चरण वाचताना संदर्भ म्हणून समोर येते. मात्र कवितेतील हा संदर्भ पावसाशी जोडलेला नसून परीशी जोडला गेला आहे असे दिसते. अशा रीतीने काही कवितांमधून विंदांनी संस्कृतीतील परिचित कथागीतांच्या संदर्भांची बाह्यचौकट स्वीकारत आशयाचे अपरिचितीकरण (कमजिपसपंतप्रंजपवद) केले आहे. त्यामुळे एका बाजूला काव्यगत अपरिचिताचा संस्कार झालेला संदर्भ आणि दुसर्याप बाजूला स्मरणरंजन यांचा कलात्म मेळ या प्रकारच्या कवितांमध्ये साधलेला दिसतो.

विंदांच्या बालकवितांचा एक महत्त्वाचा विशेष असा की, या कविता लहान मुलांसाठी असल्या तरीही यातील काही कविता मात्र लहान आणि प्रौढ या दोन्ही स्तरांवर वेगवेगळे अर्थ प्रसविण्याची क्षमता

बाळगून असलेल्या दिसतात. या कवितांमधून कवीने काही कल्पनांचे पुरोभूमीकरण (वितमहतवनदकपदह) केलेले असल्यामुळे लहान मुलांना वरवर दिसणारा अर्थ कळू शकेल. मात्र या पृष्ठस्तरीय अर्थापलीकडे असणारा अर्थ त्यांना कळणार नाही. परंतु प्रौढांना कवितेतील वाच्यार्थाला ओलांडून जाणारा अर्थ प्रतीत होऊ शकेल. 'पिशी मावशीचं गाणं' ही कविता या दृष्टीने विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. नात्याच्या संदर्भात घुसमटलेल्या कोणालाही या नात्यांच्या पलीकडे जाऊन उरावेसे वाटणे आणि नात्यांच्या पलीकडे गेल्यावर एकाकी वाटत राहाणे, हे एकाकीपण भोगत असताना समोर साप दिसणे म्हणजे मोह दिसणे आणि माणसाने त्याच्याही नकळत पुन्हा मोहात स्वतःला अडकवून घेणे अधोरेखित होताना दिसते. 'परी ग परी'मधील परीला मुल नसणे , तिने पाळण्यात फुल ठेवणे हा संदर्भही मुल होऊ न शकलेल्या स्त्रीच्या दुःखाचा, तिला वाटू शकणार्यु रितेपणाचा अस्फुट उच्चार करताना दिसतो. 'पाणबुडी', 'आजी' या कवितांमधून वृद्ध व्यक्तींचे मोहांपासून दूर न जाता उलट सरत्या काळात अधिकाधिक आसक्त होणे आणि उरलेल्या जीवनातील आनंदाचे क्षण हावरटपणाने साठवून घेणे हे संदर्भ व्यक्त होतात. लहान मुलांना या कवितेतील अतिशयोक्त संदर्भांमागील जीवनासक्तीची मूलप्रेरणा न कळल्यामुळे कवितेतील संदर्भ त्यांच्या आनंदाला, मनोरंजनाला कारण देतील. परंतु प्रौढ वाचकांच्या मनात 'पिशी मावशीच गाणं' या कवितेत शेवटी शिल्लक उरणार्याल सापरूपी वासनामय जगाच्या मोहाचा आठव होऊन, जीवनाला व्यापून उरणारी 'उपभोगण्याची वृत्ती' अधोरेखित होऊ शकेल, असे दिसते.

विंदांच्या काही बालकवितांमधून नातेसंबंधांबद्दलचे कवितागत मीचे भान सूचकपणे व्यक्त होताना दिसते. गाडी आली, गाडी आली या कवितेत घरी येणार्याम मामीला कॉफी, मामाला शिरा, आजीला भाजी देण्याचे बेत आखणारा कवितागत मी, आईबाबा येताच 'तिच्यासाठी माझी मिठी' म्हणत पुढे येतो. येथे इतर नातेवाईकांसाठी खाण्याचे पदार्थ देण्याची तयारी दाखविणारा कवितागत मी आईसाठी मात्र असे कोणतेही लौकिक पदार्थ न ठेवता स्वतःचा असलेला भावनिक संदर्भ 'मिठीतून' व्यक्त करतो. मामा—मामी—आजीच्या संदर्भातील औपचारिकता आईच्या बाबतीत पूर्णतः गळून पडते. तसेच बाबा पुढे असताना मागे असणार्या. 'आईला मिठी मारेन', म्हणणार्या कवितागत मीच्या माध्यमातून बालविश्वात आईचे असलेले स्थान अधोरेखित होते. 'मावशी' कवितेत मावशी, काकू आणि आत्या अशा तीन स्त्रियांचा उल्लेख होतो. या तिघींपैकी मावशी आणि आत्या ही कवितागत मीच्या अनुक्रमे आईची आणि बाबांची रक्ताची बहीण आहे. या दोघींनी पापी आणि पत्ते आणणे आणि या पार्श्वभूमीवर काकूने चाकू आणणे यातून काकूचे उपरेपण, तुटलेपण नेमकेपणाने सूचित होते. येथे 'चाकू' हा शब्द 'काकू' या शब्दाशी केवळ यमकाचे नाते सांगण्यासाठी आलेला असावा असे दिसत नाही.

विंदांनी बालकवितेत आघातानुसारी आणि उच्चारानुसारी मुक्तछंदाचा उपयोग केला आहे. लहान मुलांना सहज समजेल अशा सुगम भाषेचा वापर कवितेत केला आहे. कवितागत पात्र परस्परांशी संवाद साधत असल्यामुळे एक प्रकारची अनौपचारिकता, मोकळेपणा, जिवंतपणा हा या कवितेचा अविभाज्य भाग झाला आहे. बालमानसिकतेचा भाग असलेले अनेक संदर्भ काव्याचा विषय होताना अनुप्रास, यमक, चेतनगुणोक्ती इत्यादी अलंकारांचा कवीने मोठ्या प्रमाणावर उपयोग केलेला दिसतो.

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून, विंदांच्या बालकवितेत आशयपातळीवर बहुस्तरीय आवाज समाविष्ट झालेले असल्यामुळे या कवितेचा अनेकानेक संदर्भचौकटीतून विचार करता येणे शक्य आहे. किंबहुना ते अत्यंत आवश्यक आहे, ही बाब स्पष्टपणे पृष्ठपातळीवर आली आहे. अशा प्रकारच्या अनेकरेषीय अभ्यासातून साम्यवादी वैचारिक वारसा घेऊन लेखन करणाऱ्या, पौर्वात्य आणि पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास असणाऱ्या, मराठी साहित्यसमीक्षाविश्व आणि भारतीय साहित्यविश्वात अग्रगण्य कवी म्हणून मान्यता पावलेल्या विंदा करंदीकरांचे भारतीय बालकवितेतील मौलिक स्थान अधोरेखित होऊ शकेल.

## संदर्भ सूची


1. करंदीकर, विंदा, राणीची बाग, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६१.
2. करंदीकर, विंदा, एकदा काय झाले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९६३.
3. करंदीकर, विंदा, एटू लोकांचा देश, मौज प्रकाशन, मुंबई , प्रथम आवृत्ती, १९६३.
4. करंदीकर, विंदा, सशाचे कान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६३.
5. करंदीकर, विंदा, परी ग परी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९६३.
6. करंदीकर, विंदा, सर्कसवाला, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, २००६.
7. करंदीकर, विंदा, पिशीमावशी आणि तिची भुतावळ, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८१.
8. करंदीकर, विंदा, अडम तडम, परचुरे प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८५.
9. करंदीकर, विंदा, टॉप , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, २००६.
10. करंदीकर, विंदा, सात एके सात, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण, २००६